## प्रकरण १ले

# प्राचीन काळ ते स्वातन्त्र्यप्राप्तीपर्यंत

## प्रकरण । ले

## प्राचीन काळ ते स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत

या प्रकरणात प्राचीन काळापासून स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतच्या राष्ट्रवादी संस्कृत साहित्याचा संक्षिप्त आढावा घेत आहे.

**मानव आणि निसर्ग :**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे इथली भूमी, नद्या, समुद्र, डोंगर, पर्वत, वृक्ष-वेली, मेघ, वायू, अग्नी, सूर्य, या सर्व निसर्ग घटकांशी इथल्या आर्यांनी जवळीक साधली. निसर्ग आणि मानवा-मध्ये आत्मीयता निर्माण झाली, एकरूपता निर्माण झाली. ही सर्व प्रकृती म्हणजे भोग्य विषय आणि मानव हा भोक्ता असा संबंध निर्माण झाला. ही सृष्टी मानवाला उपकारक वाटू लागली. त्यातूनच मानवाने तिच्याशी मातेचे नाते जोडले. अशा या मातेसमान सृष्टीची स्तुती करून तिची पूजाअर्चा करणे मानवाला अगत्याचे वाटले. या जगतामध्ये जे जे सुंदर, उदात्त, मंगल आणि उपकारक ते ते आर्यांना आदरणीय, पूजनीय वाटले. त्या सर्वांना देवता मानून त्यांनी आळवीले. त्यातूनच विविध सूक्तांची निर्मिती झाली. हया सर्वच सूक्तांमधून प्राचीन आर्यांची मातृभूमी विषयीची निष्ठा प्रकट होते.

सृष्टीच्या समिाबध्द - निस्सीम, स्थूल-सूक्ष्म, स्थिर-परिवर्तनशील अशा विभिन्न आस्ति-त्वांमध्ये आत्मीयतेची भावना असेल तर, कोणत्याही राष्ट्राची एकता अबाधित राहू शकते. या मानवीय आत्मीयतेला जागृत करून समाजामध्ये एकता, देशप्रेम निर्माण करण्याचे काम वैदिक द्रष्टया कवींपासून आजतागा-यत संस्कृत साहित्यिक करीत आले आहेत.

राष्ट्रगौरवाची भावनाच आधुनिक युगातील नव जागरणाचा मूलाधार आहे आणि म्हणूनच द्रष्टया ऋषींपासून ते व्यास, वाल्मीकी, कालिदास, भास, भारवी वगैरे प्राचीन कवींपासून स्फूर्ती घेऊन बागेवाडीकर, पळसुले, वेलणकर, वर्णेकर, क्षमा राव वगैरे आधुनिक साहित्यिक ही कामगिरी संस्कृत वाङ्मय सेवा रूपाने बजावीत आहेत.

वैदिक काळापासून स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतच्या कालावधीत निर्माण झालेल्या संस्कृत साहित्या-मधून राष्ट्रनिष्ठा कसकशी प्रकट होते, याचा विचार या प्रकरणात करीत आहे.

ऋग्वेद :

ऋग्वेद हे भारतीयांचे सर्वात प्राचीन वाङमय मानले जाते. तेव्हा ऋग्वेदामध्ये व्यक्त झालेल्या राष्ट्रीय विचारांचा परामर्श प्रथम घेत आहे.

" ते अज्येष्ठा अकनिष्ठास उद्भिदोऽ मध्यमासो महसा विवावृधु: । सुजातासो जनुषा पृश्निमातरो दिवो मर्या आ वो अच्छा जिगातन ।।" [1]

" अज्येष्ठासो अकनिष्ठास एते सं भ्रातरो वावृधु: सौभगाय ।" [2]

" संपूर्ण मातृभूमीस स्वत:ची माता समजणारे सर्व लोक खरे कुलीन आहेत. त्यांच्यात कोणी ज्येष्ठ नाही, कोणी कनिष्ठ नाही अथवा कोणी मध्यमही नाही. त्या सर्वांचा दर्जा एकसारखाच आहे. ते सर्वजण स्वत:वरचे दडपण नष्ट करून आपली उन्नती करून घेणारे आहेत. सर्वांचे विचार एकसारखे आहेत."

" ते परस्पर भाऊ भाऊ आहेत. ते स्वत:च्या ऐश्वर्यासाठी सर्व मिळून प्रयत्न करीत आहेत."

या मंत्रांमधील भूमीस माता मानण्या-याचे वर्णन लक्षात घेण्यासारखे आहे. मातृभूमीचे सर्व भक्त एकाच विचाराचे असावेत, त्यांच्यात उच्च-नीच भेदभाव असता कामा नये मातृभूमीच्या उध्दारासाठी आणि आपल्या उन्नतीसाठी सर्वांनी एकाच वेळी, एकसारखेच प्रयत्न करणे आवश्यक आहे. परस्परांशी बंधुभावाने राहणे अगत्याचे आहे.

भूमीशी मातेच्या नात्याने साधलेली जवळीक आणि या माय लेकरांच्या वात्सल्याच्या दृष्टिकोनातून जन्मभूमीकडे पाहण्याची आर्यांची वृत्ती मातृभूमीबद्दलचे प्रेम, आदर वाढविणारी आहे.

" पृथिवी स्योना अनृक्षरा निवेशनी भव । " [3]

" हे पृथ्वी, अर्थात मातृभूमे, तू सुखद, शत्रुरहीत आणि निवासप्रद हो " या प्रार्थनेवरून आपली मातृभूमी शत्रुरहीत असावी, इथे निरंतर सुख नांदावे ही आर्यांची सदिच्छा दिसून येते.

" इळा सरस्वती मही तिस्त्रो देवीर्मयोभुव: बर्हि: सीदन्त्वस्त्रिध: ।" [4]

" मातृभूमी, मातृसंस्कृती आणि मातृभाषा या तीन सुखदायी देवता आहेत. त्या सर्वकाळ अंत:करणात राहोत."

या मंत्रात मातृभूमी, मातृसंस्कृती व मातृभाषा या तीन देवता मानून त्यापैकी मातृभूमीचे प्रमुख स्थान तिचा प्रथम उल्लेख करून दर्शविले आहे. आपली जन्मभूमी, आपली संस्कृती व

आपली मायबोली यांच्याविषयी माणसाच्या मनात साभिमान प्रेम असणे आवश्यक आहे. या तिघींनाही देवत्व अर्पण करून जणू त्यांच्याविषयीचा आदरच व्यक्त केलेला आहे. आपल्या मातृभूमीप्रमाणेच संस्कृती व भाषेचे रक्षण आणि संवर्धन करणे आपले कर्तव्य ठरते.

मातृभूमीचे रक्षण करणे, तिच्या शत्रूंचा नाश करणे हे तिच्या पुत्रांचे आद्यकर्तव्य ठरते. हे काम करण्यासाठीच आपल्याला मातृभूमीने संपन्न व समर्थ करावे अशा प्रार्थना आर्यांनी केलेल्या आढळून येतात. या कार्यात आपण चूक करू नये, आपल्याकडून आपल्या मातृभूमीचा अपमान होऊ नये, आपल्या हातून तिची अवनती होऊ नये, आपल्या मायभूमीचा आपण कोणत्याही प्रकारे अपराध करू नये, स्वराज्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे सामर्थ्य आपल्यात निर्माण व्हावे,अशा विविध प्रकारच्या प्रार्थना ऋग्वेदामध्ये आढळतात.[5]

आणि हे सर्व करीत असतानाच संघटनेचे महत्त्वही आर्यांनी ओळखले होते.

" उ भा स वरा प्रत्येति भाति च,यदीं गणं भजते सुप्रयावभिः ।"[6]

जो संघटनेवर विश्वास ठेवतो, तोच उन्नती करतो. देशप्रेम,ऐक्य,सामर्थ्य व संपन्नता या सर्वांनीयुक्त असे नागरिक जेथे आहेत,असे महान राष्ट्र प्रसन्नतादायक असते हा लोकशाहीचे बीज असलेला विचारही आर्यांनी येथे केलेला दिसून येतो.

**यजुर्वेद :**

आपल्या राष्ट्रात ज्ञानसंपन्न,बुद्धिमंत,शस्त्रास्त्रसंपन्न,शत्रुंचा नाश करणारे शूर वीर जन्म घेत राहावेत, आपले राष्ट्र बुद्धिसंपन्न, सामर्थ्यसंपन्न व्हावे,अशी प्रार्थना वैदिक द्रष्टया ऋषींनी परमेश्वरापाशी केलेली आहे.

" आ ब्रह्मन् बाह्मणो ब्रह्मवर्चसी जायतामाराष्ट्रे राजन्यः ।
शूर ऽइषव्यो ऽ तिव्याधी महारथोजायताम्"। [7]

**अथर्ववेद :**

राष्ट्रनिष्ठा व्यक्त करणा–या काही कांही ऋचाच केवळ अथर्ववेदात आहेत असे नव्हे, तर वैदिक आर्यांनी यासाठी काही सूक्तांची देखील रचना केलेली आढळून येते. मातृभूमीचे वैदिक गीत,राष्ट्री-देवी, राष्ट्रसभा, राष्ट्रसंवर्धन अशी काही सूक्ते केवळ राष्ट्रनिष्ठा,मातृभूभक्ती, स्वदेशप्रेम, ऐक्यभाव व्यक्त करणारी आहेत. त्याचबरोबर स्वराज्यशासनाची माहिती व महती सांगणारी सूक्तेही आढळतात. राजाच्या अंगी कोणते गुण असावेत,राजाची कर्तव्ये कोणती या गोष्टी सांगणारी सूक्तेही अथर्ववेदात

आढळतात. यातील केवळ राष्ट्रनिष्ठेसाठीच असलेल्या सूक्तांचे विवेचन करणे योग्य ठरेल. प्रथम 12 व्या कांडातील मातृभूमीच्या वैदिक गीताविषयी चर्चा करणे उचित ठरेल.

**प्राचीन राष्ट्रगीत[8]:**

सर्वच राष्ट्रातील लोकांनी मातृभूमीवरील आपले प्रेम,आदर व अभिमान व्यक्त करणारी, आपल्या देशाची स्तुती करणारी गीते रचलेली आढळतात. अशा गीतांना राष्ट्रगीत म्हटले जाते अशा प्रकारचे राष्ट्रगीत भारतीयांच्यात आहे की नाही? याविषयी विद्वानांमध्ये वाद आहेत. " भारतीयांच्यात एक राष्ट्र ही भावना कधी नव्हतीच. त्यांना राष्ट्रनिष्ठा किंवा राष्ट्रवाद ही संकल्पना माहीत झाली ती ब्रिटीशांच्या मुळे" असे म्हणणा-या विद्वानांना गप्प करता येईल असा भक्कम पुरावा अथर्ववेदात आहे. अगदी वैदिक काळात सुध्दा एक राष्ट्र ही कल्पना आमच्यात होती. आमचे प्राचीन राष्ट्रगीतही आहे. अथर्ववेदाच्या बाराव्या कांडातील पहिले सूक्त हे " मातृभूमीचे वैदिक राष्ट्रगीत"आहे.

याठिकाणी प्रश्न असा निर्माण होतो की हे सूक्त म्हणजे राष्ट्रगीत आहे हे ठरविणार कसे ? तेव्हा सूक्ताच्या उपयोगावरून त्याचे राष्ट्रीय महत्त्व ठरविता येईल.

अथर्ववेदावरील सायणभाष्यामध्ये या सूक्तांचा उपयोग केव्हा केव्हा करावा ते सांगितलेले आहे. /ग्रामपत्तनदिरक्षणार्थम्" ।[9] गाव,शहर वगैरेंच्या रक्षणप्रसंगी या सूक्ताचा उपयोग करावा. स्वदेशरक्षणाच्याप्रसंगी या सूक्ताचा उपयोग करावा.यावरून स्वराष्ट्ररक्षणाचा आणि या सूक्ताचा संबंध लक्षात येतो. सर्व देशामध्ये राष्ट्रगीताचा उपयोग अशाच कामासाठी केला जातो.म्हणजेच हे सूक्त म्हणजे भारतीयांचे प्राचीन राष्ट्रगीत आहे हे मान्य करण्यास हरकत नाही.

त्याचप्रमाणे कौशीतकी सूत्रांमध्ये " भौमस्य दृतिकर्मणि"[10] असा या सूक्ताचा उपयोग सांगितला आहे. राष्ट्राच्या आदरासाठी जे काम करावयाचे त्या कामाचे वेळी या सूक्ताचा उपयोग केला जातो. जेव्हा जेव्हा राष्ट्रोन्नतीसाठी कार्य केले जाईल, विजयोत्सव साजरे केले जातील तेव्हा तेव्हा या सूक्ताचे गायन केले जावे आणि राष्ट्रगीत हे देखील अशा प्रसंगी गाण्याची पद्धत आहे. म्हणून हे सूक्त आपले प्राचीन राष्ट्रगीत आहे. या सूक्ताच्या उपरोक्त उपयोगांवरून हे राष्ट्रगीत आहे हे सिद्ध होतेच,तथापि या सूक्ताच्या अंतरंगाचा विचार केला असता या वचनाला बळकटी येते. या सूक्तात राष्ट्रनिष्ठा ओतप्रोत भरली आहे.

**राष्ट्रगीतातील मातृभूमीची कल्पना:**

ज्या भूमीमध्ये आपण जन्मलो,जिच्यावर पोसलो त्या भूमीला वैदिक आर्यांनी माता म्हटले आहे. आमच्या प्राचीन साहित्यात मातृभमीची कल्पना स्पष्टपणे दिसून येते.

" माता भूमिः पुत्रो ऽ हं पृथिव्याः । " [11]

" भूमी ही माझी माता आहे आणि मी या मातृभूमीचा पुत्र आहे, आमच्या देशाची भूमी आमची माता आहे आणि आम्ही सर्व तिचे पुत्र आहोत. म्हणजे सर्व देशनिवासी एकाच मातेचे पुत्र असल्याने बांधव आहेत ही बंधुत्वाची भावना इथे व्यक्त होते.

अथर्ववेदात बऱ्याच ठिकाणी "भूमि" हा शब्द आलेला आहे. तेव्हा याचा अर्थ केवळ जमीन न करता मातृभूमी किंवा राष्ट्रभूमी करण्यास आधार काय ?अशी शंका येण्याची शक्यता आहे.तेव्हा "भूमि" म्हणजे मातृभूमी किंवा राष्ट्रभूमी असा अर्थ घेण्यास उपयुक्त वचन अथर्ववेदात आढळते.

" सा नो भूमिस्त्विषिं बलं राष्ट्रे दधातूत्तमे ।" [12]

" ती आमची मातृभूमी आमच्या उत्तम राष्ट्रात तेज आणि बल वाढवो." येथे "उत्तमे राष्ट्रे" आणि "नो भूमिः" चा अर्थ एकच आहे. " आमच्या उत्तम राष्ट्रात भूमीने बल आणि तेज वाढवावे". येथे आमच्या राष्ट्रातील आमची भूमी म्हणजेच " राष्ट्रभूमी" किंवा " मातृभूमी" असा सरळ अर्थ निघतो.

शिवाय या मंत्रातील " उत्तमे राष्ट्रे " या शब्दांवरुनराष्ट्रभक्तांची उच्च आकांक्षाही व्यक्त होते. " इतर राष्ट्रांपेक्षा आमचे राष्ट्र उत्तम स्थितीत असले पाहिजे. या महत्त्वाकांक्षेवरुन हेही सिध्द होते की, वैदिक सूक्तांत केवळ राष्ट्र,मातृभूमी एवढयाच कल्पना नाहीत,तर आपले राष्ट्र "सर्वोत्तम राष्ट्र" व्हावे अशी महत्त्वाकांक्षाही आहे.

या राष्ट्रगीताच्या अभ्यासावरुन आमचे प्राचीन संस्कृत साहित्य प्रखर राष्ट्रीय भावना जागृत करणारे आहे हे ध्यानात येते.

**राष्ट्रोन्नतीस आवश्यक गुण–**

वैदिक राष्ट्रगीताच्या पहिल्याच मंत्रात आपल्या राष्ट्राची उन्नती साधण्यास कोणते गुण उपयुक्त आहेत. ते सांगितलेले आहे.

" सत्यं बृहदृतमुग्रं दीक्षा तपो ब्रह्म यज्ञः पृथिवीं धारयन्ति । सा नो भव्यस्यपत्न्युरुं लोकं पृथिवी नः कृणोतु ।। " [13]

सत्य,सरलता,उग्रता,उदारता,तप,ज्ञान, यज्ञ इत्यादि गुण मातृभूमीस धारण करतात ती (मातृभूमी)आमच्या भूत, भविष्य आणि वर्तमान स्थितीचे पालन करणारी आमची मातृभूमी आम्हास कार्य करण्यास विस्तृत स्थान देवो.

"सत्य" हा सर्वात पहिला राष्ट्रीय गुण आहे. ज्याच्यामध्ये सत्यप्रियता आहे, सत्यपालनासाठी आत्मासमर्पण करण्यास जो तयार असतो,तोच राष्ट्राचा उद्धार करु शकतो.

त्यानंतरचा गुण आहे "सरलता". ज्याचे आचरण सरळ तोच राष्ट्राला योग्य मार्गाने नेऊ शकतो.अन्यथा स्वत:बरोबर राष्ट्रासही अधोगतीस नेतो.

"उग्रता" हा शूरवीरांचा गुण आहे. जे क्षत्रिय या गुणाने युक्त आहेत तेच राष्ट्राचे वैभव वाढवू शकतात. रक्षण करू शकतात.

"दक्षता" म्हणजे सावधानता हा त्यानंतरचा आवश्यक गुण आहे. कोणत्याही कार्याची सफलता ही दक्षतेवरच अवलंबून असते.

त्यानंतरचा गुण "तप" आहे. कार्यामध्ये विघ्ने आणणा-या थंडी,ऊन,पाऊस,लाभ, हानी,सुख,दु:ख,मोह,क्रोध यांच्याशी टक्कर देऊन जो खंबीरपणे उभा राहू शकतो तोच राष्ट्रोद्धार करू शकतो. तपश्चर्येने माणसाच्या ठायी सहनशीलता आणि चिकाटी निर्माण होते. राष्ट्राच्या दृष्टीने या गुणांचे महत्त्व कमी लेखून चालणार नाही.

त्यानंतरचा गुण "ब्रम्ह" म्हणजे ज्ञान होय. ज्याप्रमाणे ज्ञानामुळे कोणतीही व्यक्ती आत्मबंधनातून मुक्त होते त्याप्रमाणे ज्ञानामुळे राष्ट्रसुद्धा स्वतंत्र होते. जगाच्या ज्ञानाबरोबर किंबहुना जगाच्या ज्ञानापेक्षा स्वत:च्या राष्ट्राचे ज्ञान वाढेल असे प्रयत्न होणे आवश्यक असते.

"यज्ञ" हा शेवटचा गुण आहे. यज्ञामुळे आत्मसमर्पणाचा भाव प्रकट होतो. राष्ट्रोन्न-तीच्या यज्ञात स्वसुखाची आहुती देण्याची तयारी पाहिजे.

तेव्हा राष्ट्राच्या उद्धारासाठी,उन्नतीसाठी आणि रक्षणासाठी लोकांच्यामध्ये सत्य, सरलता,उग्रता,दक्षता,तप,ज्ञान, आणि यज्ञ या गुणांची नितांत आवश्यकता असते. या गुणांचा अभाव असलेले राष्ट्र आपले स्वातंत्र्य गमावते व त्याची अधोगती होते.

**राष्ट्रगीतातून व्यक्त होणारी ऐक्यभावना :**

राष्ट्राचा विकास साधावयाचा असेल,राष्ट्राचे स्वातंत्र्य अबाधित राखावयाचे असेल, राष्ट्राचा उत्कर्ष करावयाचा असेल,तर सर्वात महत्त्वाचा व योग्य उपाय म्हणजे राष्ट्रातील ऐक्य टिकवून ठेवणे. "एकीचे बळ मिळते फळ" हे तत्त्व प्रत्येक नागरिकाने लक्षात ठेवले पाहिजे. त्यानुसार आचरण केले पाहिजे. एकीचे महत्त्व वैदिक सूक्तकर्त्यांनी पूर्णपणे ओळखले होते. हे पुढील मंत्रावरून सहज लक्षात येते-

"जनं बिभ्रती बहुधा विवाचसं नानाधर्माणं पृथिवी यथौकसम् । सहस्त्रं धारा द्रविणस्य मे दुहां ध्रुवेव धेनुरनपस्फुरन्ती ।।"[14]

अनेक भाषा बोलणारी आणि नाना धर्म अनुसरणारी जी जनता आहे तिला एकाच घराप्रमाणे धारण करणारी मातृभूमी भाग्याचे हजारो प्रवाह आम्हाला देवो. ज्याप्रमाणे शांत राहणारी गाय

शांतपणे दूध देते त्याप्रमाणे मातृभूमी मला ऐश्वर्य देवो.

आपल्या देशात विविध भाषा बोलणारे, विविध धर्मांचे, पंथांचे, विविध रीतिरिवाजांचे लोक राहतात. त्या सर्वांनी भाषाभेद, प्रांतभेद, धर्मभेद, जातिभेद विसरून एकत्रित यावे. केवळ राष्ट्रहिताचा विचार करून ऐक्यवृत्तीने एकाच घरात राहणा-या भावंडांप्रमाणे या देशात केवळ मायभूमीच्या सौख्याचा, समृद्धीचा विचार मनात बाळगून गुण्यागोविंदाने रहावे. मगच ही मायभूमी त्यांनाही समृद्धी, सुख व शांती देईल.

ज्या राष्ट्रात सर्वत्र समभाव असतो, जातीजातीत समानता असते, विषमतेला थाराही नसतो, हितैक्य बुद्धीनेमातृभूमीसाठी झटणारे नागरिक असतात त्या राष्ट्राचा उत्कर्ष व्हायला वेळ लागत नाही. याविषयी अथर्ववेदातील या राष्ट्रगीतात एक मंत्र आलेला आहे-

"असंबाधं बध्यतो मानवानां यस्या.........."[15]

"ज्या मातृभूमीच्या मानवांमध्ये अत्यंत निर्वैर भाव असेल" अर्थात ज्या देशामध्ये उच्च-नीच, ज्ञानी-अज्ञानी गरीब-श्रीमंत, मालक-नोकर या सर्वांच्यात समभाव असेल, निर्वैरभाव असेल त्या देशाची उन्नती होईल. वैविध्यपूर्ण अशी ही माणसे जर राष्ट्रधर्माने बांधली जातील तर त्यांच्यात वैरभावकधीच निर्माण होणार नाही.

आपण सर्व एकाच मातृभूमीची मुले आहोत. आपल्या सर्वांची जन्मभूमी एकच आहे. आपण सारे बांधव आहोत. त्यामुळे आपल्या मायभूमीचे रक्षण करणे आम्हा सर्वांचे कर्तव्य आहे. याची जाणीव वैदिक आर्यांना होती.

**राष्ट्रगीतातून व्यक्त होणारे मातृभूमीप्रेम :**

मातृभूमीविषयी नागरिकांच्या मनात जर प्रेम निर्माण करावयाचे असेल तर देशातील नगरे, नद्या, पर्वत, पवित्र तीर्थक्षेत्रे, ऐतिहासिक स्थळे यांच्याविषयी त्यांच्या मनात प्रेमादर, आपुलकी निर्माण करणे अगत्याचे आहे आणि अथर्ववेदातील राष्ट्रगीताने ही कामगिरी उत्कृष्टपणे बजाविली आहे.

" यस्याः पुरो देवकृता क्षेत्रे यस्या विकुर्वते ।
प्रजापतिः पृथिवीं विश्वगर्भामाशामाशां रण्यां नः कृणोतु ।।"[16]

आमच्या देशातील स्थळांचे पावित्र्य, माहात्म्य स्पष्ट करण्यासाठी ती देवतांनी वसविलेली आहेत असे म्हटले आहे. त्यामुळे या स्थळांविषयी भक्ती, आदर, अभिमान निर्माण होण्यास मदत होते.

या मंत्रात केवळ देवतांमुळे आमची भूमी पवित्र झालेली आहे एवढेच सांगून ऋषी

थांबले नाहीत, तर एक अतिशय महत्त्वाची गोष्ट सांगितली आहे ती म्हणजे, " येथील लोक कार्यरत आहेत." आपल्या कर्तव्य परायणतेमुळे, देशावरील प्रेमादरामुळेच आपला देश रमणीय वाटणे शक्य आहे.

**राष्ट्रगीतातून केलेले विभूतिपूजन :**

आपल्या देशात अनेक देवता, ऋषिमुनी, पराक्रमी लोक, विद्वान होऊन गेले आहेत. त्या सर्वांचे स्मरण, त्यांचा गौरव या वैदिक राष्ट्रगीतात केलेला दिसून येतो.

ऋषिमुनी सत्र आणि यज्ञाच्या निमित्ताने राष्ट्रात ऐक्य निर्माण करीत, राष्ट्रजागृती करीत, हे यज्ञ किंवा सत्र करण्याच्या पध्दतीवरुन सहज लक्षात येते. अशा या ऋषींचे स्मरण रास्तच आहे![17]

लोकांचे कल्याण करु इच्छिणा-या आत्मज्ञानी ऋषींनी प्रारंभी तप केले त्यामुळे राष्ट्रात बळ आणि ओज उत्पन्न झाले, म्हणून देवतांनी त्यांना नमन केले पाहिजे. असेही एके ठिकाणी म्हटलेले दिसून येते.[18] या मंत्रांत स्पष्टच म्हटले आहे की ऋषींच्यामुळेच राष्ट्रामध्ये बल आणि ओज निर्माण झाले. म्हणजेच राष्ट्रीयता निर्माण होण्यासाठी ऋषींचे प्रयत्न कारणीभूत झालेले आहेत आणि म्हणूनच राष्ट्रगीतात त्यांना मानवंदना दिली आहे.

समाज प्रबोधनासाठी, शूर वीरांचे, संतांचे, देवतांचे स्तवन उपयुक्त ठरते. म्हणूनच वैदिक राष्ट्रगीत कर्त्यांनी विभूतिस्तवन केलेले आहे. अशा प्रकारे मातृभूमीविषयीचे प्रेम, राष्ट्रनिष्ठा वृध्दिंगत करणारे असे हे प्राचीन राष्ट्रगीत आहे.

**राष्ट्रदेवी सूक्त ( अथर्व. 4/30)**

अथर्ववेदातील चौथ्या कांडात तिसावे सूक्त परमात्मशक्तीचे वर्णन करण्यासाठी आले आहे. विद्वान या सूक्ताचे तीन प्रकारे अर्थ लावतात; आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक. या सूक्ताचे वैशिष्टय हे की ही शक्ती स्वत:चे वर्णन स्वत:च करीत आहे. अशा प्रकारची याची रचना आहे. या परमात्म-शक्तीलाच राष्ट्रीशक्ती असे म्हटले आहे.

" अहं राष्ट्री संगमनी वसूनां चिकितुषी प्रथमा यज्ञियानाम् । "[19]

मी राष्ट्रीशक्ती वसूंना प्राप्त करविणारी आणि ज्ञान देणारी आहे. सर्व पूजनीयात मी प्रथम (पूजनीय) आहे.

या सूक्तात " राष्ट्री" हा शब्द आलेला आहे. राष्ट्र जिच्यामुळे टिकून राहते. ती शक्ती म्हणजे राष्ट्रीशक्ती होय. तिच्यामुळे राष्ट्राचा उध्दार, उत्कर्ष आणि रक्षण होते. ही राष्ट्रीशक्ती समाजातील चारी वर्णातील लोकांच्यामध्ये निर्माण होते, तेव्हा राष्ट्राचा उत्कर्ष होतो. लोक जेव्हा राष्ट्री-देवीस प्रसन्न करुन घेण्यासाठी सर्वस्व अर्पण करु लागतात तेव्हा ती प्रसन्न होते.

याउलट राष्ट्रीदेवीची उपासना न करणारे, तिचा अपमान करणारे लोक तावडतोब नाश पावतात. राष्ट्रात अथवा राष्ट्राबाहेर असणा-या दुष्टयांना नामोहरम करण्यासाठी राष्ट्रातील विविध शस्त्रास्त्रांचे साठे सज्ज ठेवण्याचे काम ही राष्ट्रीदेवीच करते. ही शक्ती सर्वांचे उत्तम प्रकारे पालनपोषण करते, उन्नती करते. राष्ट्रीय चळवळीत ती प्रकट होते.

अशा प्रकारे या सूक्तात राष्ट्रीय शक्तीचे कार्य तिचा प्रभाव, तिचे सामर्थ्य यांचे वर्णन केले आहे. या सूक्ताच्या अध्ययनाने, मननाने व चिंतनाने लोकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होणे सहज शक्य आहे.

**राष्ट्रसभा सूक्त : (अथर्व. 7/12)**

राष्ट्राची उन्नती साधण्यासाठी राष्ट्रसभेची आवश्यकता वैदिक आर्यांनी ओळखली होती राजाला मार्गदर्शन करणारी, राज्यकारभारात सुसूत्रता आणणारी, सार्वजनिक हिताचा विचार करणारी अशी ही राष्ट्रसभा आहे.

राष्ट्रसभेचा अधिकार राष्ट्रावर, राजावर असतो. हिलाच " नरिष्ठा"असेही म्हणतात. " नरैः इष्टा" मनुष्यांना जी इष्ट आहे अशी किंवा " न रिष्टा" म्हणजे अहिंसक अशी सभा. जी दुस-या कोणाचा नाश करीत नाही किंवा जिचा कोणी नाश करीत नाही अशी सभा.

या सभेने एकमताने राष्ट्राचा सर्व व्यवहार चालवावा असे सूक्तात म्हटलेले आहे. राष्ट्र-सभेचे सभासद " सवाचसः" असले पाहिजेत [20], म्हणजे सभासद सत्य, स्पष्ट, निर्भीड, उचित वचन बोलणारे असले पाहिजेत. राष्ट्राच्या हिताचा विचार करुन बोलणारे असले पाहिजेत. त्यांच्यामुळे राष्ट्रनिष्ठा निर्माण होण्यास मदत होते.

राजाचे भाग्य, ऐश्वर्य, अधिकार सारे कांही या राष्ट्रसभेवरच अवलंबून असते. तीच राजाची तारक, मारक, जनक आहे. या सूक्तावरुन आदर्श राज्याची कल्पना येते. प्रजेच्या हिताला दिलेले प्राधान्य उल्लेखनीय आहे.

**राष्ट्रसंवर्धन सूक्त (अथर्व 1/29):**

अथर्ववेदातील पहिल्या कांडामध्ये जे एकोणतिसावे सूक्त आहे त्यामध्ये राष्ट्राच्या संवर्धनासाठी राजाचे कसे आचरण असावे ? याविषयीची माहिती राजा आणि पुरोहित यांच्या संवादातून होते. जरी वैयक्तिकरित्या राजाला उद्देशून उपदेश असला तरी सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीनेही उपयुक्त असे अर्थ निघू शकतात. कारण राष्ट्रसंवर्धनाची जबाबदारी एकटया राजाची नसते. सर्वांच्या सहकार्याने घडणारी ही प्रक्रिया आहे. त्यादृष्टीने कांही महत्त्वपूर्ण मंत्र पुढीलप्रमाणे-

" तेनास्मान् ब्रह्मणस्पतेऽभि राष्ट्राय वर्धय ।"[21]

" हे ब्रह्मणस्पते,आमची राष्ट्रासाठी अभिवृध्दी कर". या मंत्रात अभिवृध्दीची मागणी केलेली आहे,परंतु ती वैयक्तिक स्वार्थासाठी नाही तर राष्ट्रासाठी आहे. राष्ट्रहितार्थ आम्हाला मोठे कर. यामध्ये प्रार्थना एकटयाने केलेली नाही. हे "अस्मान्" या शब्दावरुन ध्यानात येते.येथे एकटया कोणाची प्रगती अभिप्रेत नाही, तर सर्वांचीच प्रगती अभिप्रेत आहे. यावरुन समभाव,ऐक्य आणि राष्ट्रहिताचा विचार प्रकट होतो.

याखेरीज राजाची कर्तव्ये,राजनीती यांवर आधारित अनेक सूक्ते अथर्ववेदात आहेत: त्यातूनही तत्कालीन ऋषींची मातृभूभक्ती राष्ट्रप्रेम व्यक्त होते.

**पुराणे :**

पुराणांमध्ये भारतवर्षाला: पूर्णत: एकात्मतेचे स्वरुप प्राप्त झालेले आढळून येते.

"उत्तरं यत् समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणम् ।

वर्षं तद् भारतं नाम भारती यत्र सन्तन्ति: ।।[22]

"विष्णू" पुराणातील या भारत आणि भारतीय यांच्या वर्णनाला अनुसरुन भारताचे एक संपूर्ण सलग चित्र स्पष्ट करणारे अनेक श्लोक विविध पुराणांमध्ये आढळतात. उत्तरेकडील हिमालया-पासून दक्षिणेकडील समुद्रापर्यंत पसरलेल्या विस्तीर्ण भारतभूमीचे स्मरण भारतीय करीत असत,अजूनही करतात. आमच्या नित्य पठणाच्या श्लोकांवरुन याची प्रचीती येते, की पुराणकालीन कवींनी राष्ट्रीय ऐक्य साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. या श्लोकामधून भौगोलिक आणि सांस्कृतिक एकता व्यक्त होते. विविध प्रांतांमधील नद्या, कुलपर्वत,मोक्षदायी नगरींचे प्रात:कालीन स्मरण[23]भारतीयांच्यात एकता निर्माण करण्यास कारणीभूत ठरु शकतात. राष्ट्रिय ऐक्याचे प्रतिक ठरु शकतात.

आपल्या भारतभूमीची स्तुती करणारे,तिच्या विषयीचा अभिमान व्यक्त करणारे अनेक श्लोक पुराणांमध्ये आढळतात. " भारत भूमीवर सहस्त्र जन्मांतील पुण्यसंचयनानंतर मनुष्य जन्म मिळतो." असे विष्णुपुराणात म्हटले आहे.[24] तसेच याच पुराणात "भारत भूमी सर्वकर्मफलदायिनी असून देवतादेखील तिची स्तुती करतात. या भूमीवर जन्म घेण्याची इच्छा धरतात." असेही म्हटले आहे.[25]

"जम्बुव्दीपामध्ये भारत सर्वश्रेष्ठ आहे.कारण भारत ही कर्मभूमी आहे तर बाकीच्या भोगभूमी आहेत". असे ब्रह्मपुराणात म्हटले आहे [26] एवढेच नव्हे तर भारतासारखा या पृथ्वीवर देश नाही". असेही ब्रह्मपुराणात म्हटले आहे.[27]

स्वातंत्र्याविषयी अतिशय उद्बोधक आणि मार्गदर्शक विचारही ब्रह्मपुराणात आढळतो. तो म्हणजे "स्वतंत्र व्यक्ती स्वतंत्र व्यक्तीच्या साहाय्याने स्वतंत्रता प्राप्त करते."[28] इथे ज्याप्रमाणे स्वतंत्रतेला प्राधान्य दिले आहे. त्याप्रमाणे मार्कंडेय पुराणात पराधीनतेची निंदाही केलेली आढळते. जो

माणूस पराधीन आहे. त्याच्या माणुसकीचा काय उपयोग ?[29] पराधीन मनुष्य आपली माणुसकी थोडीच आचरणात आणू शकतो ? त्याचप्रमाणे गरुड पुराणातही स्वतंत्रतेचे माहात्म्य पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे. की, "स्वतंत्र वृत्तीच्या वृत्तीचे जीवन सफल होते, पराधीन वृत्तीच्या नव्हे ।" [30] जीवनात यशस्वी व्हावयाचे असेल तर माणूस स्वतंत्र हवा. स्वातंत्र्याखेरीज यशाची अपेक्षाच करता येणार नाही.

आपले राष्ट्रसमृध्द व्हावे,आपल्या राष्ट्रात शांती नांदावी अशी अपेक्षा वराहपुराणांत व्यक्त केली आहे.।[31]

अशा प्रकारे पुराणांमध्ये राष्ट्रीय चैतन्य निर्माण करणारे विचार दिसून येतात.

**रामायण व महाभारत :**

रामायण आणि महाभारत हे दोन ग्रंथ म्हणजे राष्ट्रनिष्ठेचे उत्कृष्ट नमुने आहेत.या दोन ग्रंथांच्या चिंतनातून अनेक देशप्रेमी निर्माण झालेले आपणपाहतो. भारतीयांना प्रेरक,स्फूर्तिदायक असे हे ग्रंथ आहेत. राष्ट्रापुढे ज्याला आई,वडील,पत्नी,भाऊ,अपत्य यांचे प्रेम तुच्छ वाटले तो राजा राम हा उत्कृष्ट राष्ट्रनायक आहे. लंकेचे वैभव पायाशी लोळण घेत असता त्या स्वर्गीय सुखापेक्षा त्याला मायभूमी अधिक श्रेष्ठ वाटली. " जननी जन्मभूमीश्च स्वर्गादपि गरीयसी ।" असे म्हणणारा वाल्मीकींचा राम जनते- मध्ये राष्ट्रनिष्ठा,देशप्रेम आजही निर्माण करू शकतो. तर श्रीकृष्णाच्या रुपात व्यासांनी राष्ट्राची तारक व उध्दारक शक्ती साकार केली आहे. व्यासांनी केलेले श्रीकृष्णाचे किंवा वाल्मीकींनी केलेले रामाचे चित्रण हे उत्थानशील राष्ट्रनेत्याचे चित्रण असून अभ्युदयशील राष्ट्राला ते सर्वतोपरी मार्गदर्शक ठरणारे आहे.

राष्ट्रनिष्ठा, मातृभूमीविषयीचे अलोट प्रेम, राजनीतिविषयक विचार,राजधर्म या विषयी उपयुक्त असे भरपूर विचार महाभारतात आढळतात. स्वातंत्र्य,स्वत्वाची भावना जागृत करणारा हा ग्रंथ आहे. त्यादृष्टीने महाभारतातील केवळ "गीता" सुध्दा राष्ट्रीय भावना जागृत करणारी आहे. राष्ट्रनिष्ठेचे उत्तम प्रतीक म्हणजे भीष्म । राष्ट्ररक्षणाबाबतचे त्यांचे विचार उद्बोधक आहेत. "राष्ट्र- स्यारक्षमाणस्य कुतो भूमिः कुतः सुखम् ?[32] ज्या राष्ट्राचे रक्षण केले जात नाही.तिथे वैभव कुठले नि सुख कुठले ? राष्ट्राचे रक्षण करण्यासाठी एखाद्या कुळाचा नाश करावा लागला तरी हरकत नाही[33] असे व्यासांचे मत होते.

व्यासांनी राष्ट्रीय जीवनातील संघर्षाचे स्वरूप उकलून दाखविले आहे. महाभारतात वर्णिलेल्या धर्म व अधर्म,विवेक व अविवेक या दोन प्रवृत्ती राष्ट्रीय जीवनात दिसून येतात आणि यापैकी ज्या प्रवृत्तीवर राष्ट्रजीवन आधारलेले असते त्यावरूनच त्याचे पतन किंवा उत्थान संभवते.

या ग्रंथांच्या अनुशीलनानेच शिवाजी, टिळक, गांधी, विवेकानंद, सावरकर, नेहरू वगैरे राष्ट्रपुरुषांच्या मनामध्ये राष्ट्रनिष्ठा, सत्यनिष्ठा, ध्येयनिष्ठा वृध्दिंगत झालेली दिसून येते. म्हणूनच रामायण महाभारतांना आम्ही आमचे राष्ट्रीय ग्रंथ मानतो. त्यांच्या वाचनात धर्म, प्रांत, जात आड येत नाही.

**निरुक्त :**

देव एक की अनेक याचे विवेचन करताना यास्काचार्यांनी " देवतांचे एकत्व आणि अनेकत्व " नरराष्ट्रा"प्रमाणे"[34] असे म्हटले आहे. राष्ट्र हे स्थान किंवा भोग या दृष्टीने विचार करता एकच आहे. परंतु भोग घेणा-यांचा विचार करता अनेक आहे. व्यक्ती म्हणून लोक अनेक असले तरी राष्ट्र म्हणून ते एकच असतात. अनेकांतून एकत्व पाहण्याची ही वृत्ती येथे व्यक्त होते.

**प्राचीन विदग्ध काव्यांमधून व्यक्त होणारे राष्ट्रीय विचार:**

धार्मिक आणि दार्शनिक साहित्याबरोबरच संस्कृतमध्ये विलासी, शृंगार व वीररसप्रधान साहित्याची निर्मिती प्राचीन काळापासून होत आहे. आपली मातृभूमी, संस्कृती आणि परंपरांविषयीचे प्रेम, अभिमान प्राचीन विदग्ध साहित्यात भरपूर प्रमाणात दिसून येतो. त्यातून समाज प्रबोधन होण्यास मदत होते. भासापासून राजशेखरपर्यंत होऊन गेलेल्या कांही कवींच्या राष्ट्रनिष्ठेची सारांशाने ओळख करून घेऊ या.

**भास:**

भासाच्या तेरा नाटकांचा विचार करता सर्वसाधारणपणे त्याची बहुतेक सर्व नाटके " हरवलेल्या राज्याची प्राप्ती" या सूत्राने बध्द असलेली दिसतात. "स्वसामर्थ्याच्या जोरावरच स्वराज्य-प्राप्ती शक्य आहे". हे भासाने "दूतवाक्यम्" या नाटकात सांगितले आहे.[35]

राज्यप्राप्ती शत्रूंना जिंकून केली जाते. जगामध्ये राज्य मागितले जात नाही आणि दान म्हणून कोणी कोणाला देतही नाही. हा त्याचा संदेश सर्वकाळी सर्वांनाच मान्य होण्यासारखा आहे.

त्याचप्रमाणे राष्ट्ररक्षणासाठी आलेले मरण हे क्षत्रियाला स्वर्गप्राप्ती करून देणारे आहे. हा विचार भासाच्या " कर्णभारम्" या नाटकांत येतो.[36]

भासाच्या बहुसंख्य रूपकांतील भरतवाक्यांमधून त्याची राष्ट्रनिष्ठा प्रकट होते. त्याने हिमालयापासून सागरापर्यंत भारतामध्ये एकछत्री साम्राज्याची इच्छा व्यक्त केली आहे. सर्व प्रजेच्या सुखाची अभिलाषा धरली आहे. आणि आपल्या देशाच्या शत्रूंचा नाश इच्छिला आहे.[37]

**कालिदास :**

संस्कृत साहित्यिकांमध्ये कालिदासाला असाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. व्यास

वाल्मीकींप्रमाणेच भारताचा राष्ट्रकवी म्हणून त्याला मान्यता मिळाली आहे. अशा या राष्ट्रकवीच्या (सप्तरंगी) साहित्यामधून त्याची राष्ट्रनिष्ठा कशी व्यक्त होते. त्याचा थोडक्यात परामर्श घेऊ या.

कालिदासाच्या ग्रंथामधून त्याचे स्वदेशप्रेम, इथल्या चराचराविषयीची प्रीती, राष्ट्राविषयीची आत्मीयता, इथल्या संस्कृतीचा-परंपरांचा सार्थ अभिमान त्याच्या निसर्गवर्णनातून, भूप्रदेशांच्या वर्णनातून प्रकट होतो. भारताच्या एकात्मतेचे दर्शन कालिदास घडवितो. रघुराजाच्या दिग्विजयाचे वर्णन वाचताना किंवा अश्वमेध वर्णन प्रसंगी कालिदास एकछत्री साम्राज्याचे स्वप्नं तर पाहत नाही ना ? भारतवर्षाची अखंड एकता त्याला अभिप्रेत असावी कां ? असे प्रश्न वाचकांना पडतात. एका महान भारतराष्ट्राची मूर्तिमंत कल्पना येथे आहे.[38]

रघुवंशातील राजांचे वर्णन करताना कालिदासाच्या मनातील राष्ट्रहिताची भावना व्यक्त होते. या गुणवर्णनातून त्याने आपल्या समकालीनांपुढेच नव्हे तर सर्वदेशीय, सर्वकालिक समाजापुढे राष्ट्रनायकाचा आदर्श ठेवलेला आहे.[39] त्याग हा राजधर्माचा प्राण मानून त्याने त्याचे राजे त्यागी दाखविले आहेत. राष्ट्रयशवर्धक कृत्यांना कालिदास अत्यंत महत्त्व देतो म्हणूनच त्याचे सर्वच राजे स्वतःची कुळाची आणि राष्ट्राची कीर्ती वृध्दिंगत करणारी कृत्ये करण्यात तत्पर दिसतात.

"शत्रूच्या नाशासाठी स्वार्थत्याग करून, सर्वांनी एकत्र येऊन लढा दिला तर, तो निश्चितच यशस्वी होतो" हे तत्त्व कुमारसंभवातून कालिदासाने मांडले आहे, स्वार्थ आणि अहंकार सोडून सगळे देव एकत्र आले त्यामुळेच तारकासुराचा वध होऊ शकला. या उदाहरणातून परकीय आक्रमणे एकजुटीने परतवून लावण्याची प्रेरणा मिळते.

विस्तारभयास्तव कालिदासाच्या राष्ट्रीय विचारांचा संपूर्ण आढावा घेत नाही. नमुन्यादाखल ढोबळ मानाने त्याच्या साहित्यातून व्यक्त होणारी त्याची राष्ट्रनिष्ठा थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. वास्तविक कालिदासाच्या केवळ सात कृतींमधून व्यक्त होणाऱ्या राष्ट्रीय विचारांवर स्वतंत्र निबंध देखील लिहिता येईल.

बहुतांशी काव्यांमधून भारताच्या विविध भूभागांचे वर्णन कवींनी आत्मीयतेने केलेले दिसते. येथील परंपरा, संस्कृती, विविध आदर्श, श्रुतिस्मृतिपुराणोक्त सनातन धर्म या सर्वांवरील श्रध्दा, अभिमान प्रत्येक कवीच्या काव्यामधून स्पष्ट झालेला दिसतो. त्यामुळे प्रत्येक कवीच्या काव्यातील या विषयांना वगळून केवळ प्रत्येक कवीचे स्वातंत्र्य, पारतंत्र्य, शौर्य, पराक्रम, आदर्श राष्ट्रनायक, ऐक्य, शांतता व समृध्दी यावरील विचार, त्यातील राष्ट्रीय प्रेमप्रवाहाचा विचारच करीत आहे.

**विशाखदत्त :**

विशाखदत्ताने " मुद्राराक्षस" हे चाकोरीबाहेरचे नाटक लिहिले. हे एक राजनैतिक नाटक आहे. अमात्य राक्षक आणि आचार्य चाणक्य या कूटनीतिनिपुणांच्या निष्ठांवर आधारित असे हे नाटय आहे.

जरी चाणक्याने नंदांचा नाश व्यक्तिगत सूडभावनेने केला असला तरी त्याच्या राष्ट्रा-विषयीच्या भावना,प्रजेच्या कल्याणाची, समृध्दीची तळमळ, संपूर्ण, अखंड एकात्म भारताची कल्पना वाखाणण्याजोगी आहे. चाणक्य स्वत: संन्यस्त वृत्तीने राहून राष्ट्रकल्याणासाठी जी धडपड करतो ती प्रत्येक राष्ट्रनायकाला आचरणीय- अनुकरणीय आहे.चंद्रगुप्त आणि चाणक्याचा विजय करविण्यात विशाख-दत्ताची अदम्य राष्ट्रीय भावनाच व्यक्त होते. अमात्याची निष्ठा ही " राजनिष्ठा" आहे तर चाणक्याची निष्ठा त्यापेक्षा उच्चकोटीची " राष्ट्रनिष्ठा" आहे. या विजयातून " राजनिष्ठेपेक्षा राष्ट्रनिष्ठा श्रेष्ठ असते" हेच विशाखदत्तने दाखवून दिले आहे. राष्ट्रामध्ये चाणक्याने निर्मिलेली ऐक्य भावना,वृध्दिंगत केलेली सांघिक वृत्ती विशाखदत्ताच्या मनातील राष्ट्रचैतन्याचे मूर्तिमंत प्रतीक आहे.

**अश्वघोष :**

सौंदरनंद आणि बुध्दचरित या काव्याचा कर्ता अश्वघोष याने आदर्श राजाचे जे चित्र रेखाटले आहे. त्यावरून त्याचे राष्ट्रीय विचार प्रकट होतात. अश्वघोषाचे शाक्यवंशीय राजे "सुवर्ण-स्तम्भवष्मर्णि: ,सिंहोरस्का:, महाभुजा:" आहेत.[40] शारीरिक सामर्थ्य आणि सौंदर्याबरोबरच आंतरिक पावित्र्य आणि नीतिमत्तेवर त्याचा भर आहे. अश्वघोषाच्या मते आदर्श राजा तपस्वी,तेजस्वी आणि प्रजापालक असला पाहिजे.[41]

**बाण :**

हर्षचरित आणि कादंबरी या दोन ग्रंथांचा कर्ता बाण आहे. बाणाच्या दृष्टिकोणातून आदर्श राजा धनाच्या बाबतीत निर्लोभी,दोषांना आश्रय न देणारा,इंद्रिय निग्रही,व्यसनांच्या बाबतीत नीरस, अयशाची- अकीर्तीची भीती बाळगणारा,सरस्वती परायण असावा.[42] राजा हा कल्याण करण्याच्या बाबतीत मेरूपर्वत,लक्ष्मीचा संग्रह करण्याच्या बाबतीत मंदारपर्वत,मर्यादेच्या बाबतत सागर, कलासंग्रहाबाबत चंद्र, संसार धारण करण्याबाबत धरणी, सभेमध्ये विव्दान, प्रजाकार्यदक्ष असला पाहिजे [43] आदर्श क्षत्रियाचे तेज चंद्र सूर्याप्रमाणे भुवनव्यापी असले पाहिजे,तो अग्नी, वायूप्रमाणे तेज-बलयुक्त असला पाहिजे, स्वाभिमानी असला पाहिजे[44]

बाणाचे आपल्या जन्मभूमीवर अत्यंत प्रेम आहे [45] हर्षचरितातील सातव्या उच्छ्वासा-मध्ये हंसवेगाच्या मुखाने बाणाने पारतंत्र्याविषयीचा तिरस्कार व्यक्त केला आहे.[46]

**भारवी :**

सहाव्या शतकातील मोक्षविचाराच्या आड दडलेली राष्ट्राची मरगळ मोडून काढणे हा भारवीचा "किरातार्जुनीयम्"लिहिण्यामागचा उद्देश मान्य केला,तर राष्ट्राला जागृत करण्याचा त्याचा हेतू तत्कालीन नव्हे तर आजही " किरातार्जुनीयम्" हे महाकाव्य वाचल्याने पूर्ण होण्याइतपत हे महाकाव्य प्रेरक आहे. त्यादृष्टीने तिस-या सर्गातील व्यासांचा उपदेश मननीय आहे. व्यासांचा उपदेश युधिष्ठिराच्या मोक्षोपयोगी विचारसरणीला विरोधी असून भीमद्रौपदीच्या धर्मार्थकाममूलक तेजस्वीपणाला पोषक आहे.[47]

भारवीने राजनीतीतील कांही व्यावहारिक सिध्दांत सांगितले आहेत, की जे सार्वकालिक सर्वदेशी अनुसरणीय आहेत." गुप्तचर हे राजाचे नेत्र असतात." म्हणून त्यांनी राजाला धोका देता कामा नये. अप्रिय असले तरी सत्य भाषण करताना मागेपुढे पाहू नये. राजाने प्रजेला नीतिपूर्वक जिंकले पाहिजे. निरलस होऊन, काम क्रोधादि षड्रिपुंना जिंकून नीतीने आचरण करावे.[48]

भारवीच्या मते अगदी लहानात लहान शत्रूचीदेखील उपेक्षा करु नये. जे कपटाला कपट लढवीत नाहीत ते व्यवहारशून्य पढतमूर्ख नेहमी पराभूत होतात.[49]

भारवीच्या दृष्टीने पुरुषार्थाचे आचरण केवळ वैयक्तिक स्वार्थासाठी असू नये किंवा निव्वळ भौतिक सुखासाठी असू नये. माणसाच्या पौरुषाचा उपयोग अन्यायाच्या प्रतिकारार्थ,देशद्रोहींच्या सर्वनाशार्थ तसेच देशात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी केला जावा.[50] अन्यायी शत्रुंचा सर्वनाश करण्यातच जीवनाची सार्थकता आहे.[51] व्यासांच्या मुखाने अन्यायपीडित मानवांना भारवी अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी सज्ज होण्याचा,शत्रुवधार्थ शस्त्र धारण करण्याचा संदेश देतो.

भारवीने आपल्या काळातील पतनोन्मुख प्रवृत्ती ओळखून त्यापासून समाजाला वाचविण्यासाठी या महाकाव्यातून संदेश दिलेला आहे. विलासामध्ये मग्न झालेल्या राजेलोकांना मोहनिद्रेतून जागविण्याचा प्रयत्न भारवी करीत आहे.

**भवभूती :**

मालती माधव,महावीरचरित्र आणि उत्तररामचरित या तीन नाटकांचा कवी भवभूती अत्यंत स्वाभिमानी होता. भारतीय संस्कृती,परंपरा यांचा अभिमानी होता. मात्र धार्मिक बाबतीत त्याचा उदार दृष्टीकोन दिसून येतो. वाल्मीकी व कालिदासाविषयी त्याच्या मनात देवतांइतकीच श्रद्धा होती.[52]

गंगा आणि पृथ्वीला देवतांचे स्थान त्याने दिले होते.[53] तेजस्विता, ऊर्जस्विता आणि शौर्याचे ते पूजक होते.[54]

**श्रीहर्ष :**

रत्नावली, प्रियदर्शिका आणि नागानंदम् या तीन नाटकांचा कर्ता श्रीहर्षदेव हा स्वत: सम्राट असल्याने शौर्य, पराक्रम आणि राजनिष्ठा त्याच्या नसानसात भिनलेली होती. मात्र बौद्ध धर्मातील अहिंसा तत्त्वाचा त्याच्यावर अत्यंत प्रभाव पडला होता. हे त्याच्या "नागानंदम्" या नाटकावरुन प्रत्ययास येते. श्रीहर्षाने नागानंदम् मध्ये जो हिंदुधर्म व बौद्ध धर्म यांच्यामध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावरुन त्याच्या सर्वधर्मसमभावाचे व ऐक्यभावनेचे दर्शन घडते.

**कल्हण :**

कल्हणाची राजाविषयीची मते "राजतंरगिणी" या त्याच्या ग्रंथामध्ये स्पष्ट झालेली दिसतात. त्याच्या मते जो राजा आपल्या प्रजेला छळतो तो सपरिवार नष्ट होतो आणि जो नष्ट झालेल्या राज्यामध्ये पुन्हा सुख-शांती स्थापितो त्याची राज्यलक्ष्मी स्थिर राहते.[55] त्याच्या मते आदर्श राजा जितेंद्रिय, निगर्वी, विनयी, धार्मिक मनोवृत्तीचा, प्रजाहितदक्ष असला पाहिजे. राजाने अहोरात्र लोककल्याणात मग्न असले पाहिजे.

कल्हण अंधश्रद्धा, अन्याय, दांभिकतेचा विरोधक होता. सामाजिक आणि राजकीय विकृती उघड करुन जनतेमध्ये आत्मविश्वास आणि विवेक जागृत करण्याचा त्याने प्रयत्न केलेला दिसून येतो. अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध आवाज उठविलेला दिसतो.[56]

एकंदरीत प्राचीन काळापासून स्वातंत्र्यपूर्व काळापर्यन्त निर्माण झालेल्या संस्कृत साहित्यातून देशनिष्ठा, मातृभूप्रेम, येथील निसर्ग, देवता, धर्म, संस्कृती, साहित्य, विभूती या सर्वांविषयीची आत्मीयता, श्रद्धा, निष्ठा व्यक्त झालेली दिसून येते. विस्तारभयास्तव अगदी महत्त्वपूर्ण, वैशिष्टयपूर्ण साहित्याचाच विचार या प्रकरणात केलेला आहे. वास्तविक वैदिककाळापासून स्वातंत्र्यपूर्वकाळापर्यन्तच्या संस्कृत साहित्यातील राष्ट्रीय विचारांवर स्वतंत्रपणे शोध निबंध लिहीणे शक्य आहे. परंतु येथे केवळ या काळातील संस्कृत कवींच्या राष्ट्रनिष्ठेचा धावता आढावाच घेतला आहे. पुढील प्रकरणापासून स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्रातील कवींच्या गद्य-पद्य-मय काव्यांचा विवेचक अभ्यासक केला आहे. त्यामुळे यापुढील काव्यामधील राष्ट्रीय विचार विस्ताराने, अभ्यासपूर्ण रीतीने मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## - संदर्भ -


1. ऋग्वेद - 5 / 59 / 6
2. -"- - 5 / 60 / 5
3. -"- - 1 /22 / 15
4. -"- - 1 / 13 / 9
5. -"- - 5/82/6, 5/66/6, 4/18/1, 1/169/8
6. -"- - 5 / 44/ 12
7. यजुर्वेद - 22 / 22
8. अथर्ववेद - 12 / 1
9. -"-सायणभाष्य- 12 / 1 / 1
10. कौशीतकी - 5 / 2
11. अथर्ववेद - 12 /1 / 12
12. -"- - 12 /1 /8
13. -"- - 12 / 1 / 1
14. -"- - 12 / 1 /45
15. -"- - 12 / 1 / 2
16. -"- - 12 / 1 / 43
17. -"- - 12 / 1 /39
18. -"- - 19 / 41 / 1
19. -"- - 4 / 30 / 2
20. -"- - 7 / 12 / 2
21. -"- - 1 /29 / 1
22. विष्णुपुराण - 2 / 3 / 1
23. गंगेच च यमुने च ......।, महेन्द्रोमलयः .........., अयोध्या ........।
24. विष्णुपुराण - 2 / 3 / 25
25. -"- - 2 / 3 / 24

26 ब्रह्मपुराण - 19/ 23

27. -"- - 27/ 71

28. -"- - 245/30

29. मार्कंडपुराण - 124 / 29

30. गरूडपुराण - 115/ 37

31. वराहपुराण - 192/ 10

32. महाभारत वनपर्व - 157 / 19

33. -"- शांतिपर्व 33 / 31

34. निरूक्त - 7 / 5

35. दूतवाक्यम् - 1 / 24

36. कर्णभारम् - 1 / 12

37. दूतवाक्यम् - 1/56 , बालचरितम् - 5/20, स्वप्नवासवदत्तम् - 6/19
कर्णभारम् - 1/25 , अभिषेकं - 6/35 प्रतिज्ञायौगंधरायणम्- 4/25
अविमारक - 6/ 21,22

38. रघुवंशम् - सर्ग - 4 था

39 .-"- - प्रस्तावना

40. सौदरनंद - 1/19

41. बुध्दचरितम् - 2/38 ते 40

42. हर्षचरितम् - पृ. 123, 124

43. -"- - पृ. 162, 163

44. -"- - पृ. 226, 227

45. -"- - पृ. 30

46. -"- - पृ. 465 ते 473

47. किरातार्जुनीयम् 3 /

48. -"- - पृ. 1 ते 9

49. -"- - 1 ते 30

50. -"- - 11 ते 67

| | | | |
|---|---|---|---|
| 51. | किरातार्जुनीयम् | – | 12/12 |
| 52 | महावीरचरितम् | – | 1 / 7 |
| 53. | उत्तररामचरितम् | – | 1 / 23 |
| 54. | महावीरचरितम् | – | 1/33, 34 |
| | उत्तररामचरितम् | – | 6/14,19 |
| 55. | राजतरंगिणी | – | 1 / 188 |
| 56. | –"– | – | 8/66 |